# न्यूज एक्सप्रेस मराठी

मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!

: ९८३४१३८४८२




# शहराच्या शेवटच्या घटकापर्यंत आरोग्य सेवा देण्यासाठी कटिबद्ध - महापौर रवि लांडगे


## वैद्यकीय विभागाच्या कामकाजाचा आढावा; सेवा गुणवत्तेत अधिक सुसुत्रता आणण्यावर भर

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड शहरातील शेवटच्या घटकापर्यंत आरोग्य सेवा देण्यासाठी कटिबद्ध आहोत, असे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी केले.

महापौर रवि लांडगे यांनी आज महापौर कार्यालयात यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय व वैद्यकीय विभागाच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला,त्यावेळी ते बोलत होते.

बैठकीला यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. राजेंद्र वाबळे, आरोग्य वैद्यकीय



अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अभयचंद्र दादेवार यांच्यासह वैद्यकीय विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

शहरातील वाढत्या आरोग्य गरजा, रुग्णालयीन सुविधा, उपचारांची उपलब्धता, तसेच विविध आरोग्य उपक्रमांची अंमलबजावणी आदी विषयांवर बैठकीत चर्चा करण्यात आली. यावेळी महापौर रवि लांडगे यांनी सर्वसामान्य नागरिकांना तत्पर, प्रभावी व दर्जेदार आरोग्य सेवा मिळाव्यात यासाठी विभागांमधील समन्वय वाढवण्यावर विशेष भर दिला. महापालिकेच्या वैद्यकीय यंत्रणेला अधिक सक्षम करत नागरिकांना गुणवत्तापूर्ण उपचार देण्यासाठी सर्वांनी समन्वयाने काम करण्याची आवश्यकता आहे, असे देखील ते म्हणाले.

बैठकीत विभागीय स्तरावरील अडचणी, पायाभूत सुविधा बळकटीकरण, मनुष्यबळ, रुग्णसंख्या वाढ, तसेच आगामी आरोग्य उपक्रमांची दिशा यावरही चर्चा झाली. महापौरांनी उपस्थित अधिकाऱ्यांना संबंधित विषयांच्या अनुषंगाने ठोस उपाययोजना करण्याचे निर्देश दिले.

# पिंपरी-चिंचवड महापालिका शहर अभियंतापदासाठी रस्सीखेच

## महापालिका शहर अभियंता मकरंद निकम यांचा स्वेच्छानिवृत्ती अर्ज आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी मंजूर केला आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिका शहर अभियंता मकरंद निकम यांचा स्वेच्छानिवृत्ती अर्ज आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी मंजूर केला आहे. त्यानुसार २८ फेब्रुवारी रोजी निकम कार्यमुक्त होत आहेत. त्यामुळे शहर अभियंतापदी कोण? अशी चर्चा सुरू आहे. सद्यःस्थितीत तीन अधिकाऱ्यांमध्ये रस्सीखेच सुरू असून, शहर अभियंतापदाची कोणाची वर्णी लागते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

शहरातील रस्ते, पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन, बांधकामे अशा विविध विकास कामांच्या तांत्रिक विभागाचे प्रमुख म्हणून महापालिकेतील शहर अभियंतापद प्रतिष्ठेचे आणि अतिमहत्त्वाचे आहे. त्यासाठी स्थापत्य अभियांत्रिकी (सिव्हिल इंजिनिअर) शाखेची पदवी अत्यावश्यक असते. शिवाय, महापालिका सेवेतील अभियंत्यांची सेवाज्येष्ठतेनुसार शहर अभियंता पदावर वर्णी लागते. विशेषतः सहशहर अभियंतापदी कार्यरत अधिकाऱ्यालाच पदोन्नती देऊन शहर अभियंतापदी नियुक्ती केली जाते. विद्यमान शहर अभियंता मकरंद निकम यांनी तीन महिन्यांपूर्वी वैद्यकीय कारणास्तव स्वेच्छानिवृत्ती मिळविण्यासाठी प्रशासन अर्थात आयुक्तांकडे अर्ज केला होता. त्यास आयुक्तांनी मंजुरी दिली असून, त्यांना २८ फेब्रुवारी २०२६ रोजी कार्यमुक्त केले जाणार आहे. त्यामुळे अधिकाऱ्यांमध्ये शहर अभियंतापदी नियुक्तीसाठी चुरस निर्माण झाली आहे.




### शाळेमध्ये रोबोटिक्स, ॲस्ट्रॉनॉमी लॅब

- **बांधकाम परवानगी व विकास :** नियमानुसार वाढीव एफएसआय किंवा उंची मान्य करणे आणि घरमालकांना दुरुस्ती परवानगी देणे
- **अनधिकृत बांधकाम नियंत्रण :** शहरात होणाऱ्या बेकायदेशीर बांधकामांवर नियंत्रण ठेवणे, अतिक्रमण काढणे, तक्रारींचे निराकरण करणे
- **पायाभूत सुविधांची देखभाल :** शहरातील रस्ते, पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन, सार्वजनिक इमारतींची बांधकामे व दुरुस्ती करणे
- **तांत्रिक व प्रशासकीय नियंत्रण :** कार्यकारी अभियंता, उपअभियंता, शाखा अभियंत्यांच्या कामकाजावर नियंत्रण ठेवून कामांची पाहणी करणे
- **निविदा प्रक्रिया :** शहराच्या विकास कामांसाठी निविदा मागवणे, छाननी करणे आणि कंत्राटदारांना कामे वाटप करणे
- **न्यायालयीन बाबी :** महापालिकेच्या बांधकाम विभागाशी संबंधित प्रकरणांत कनिष्ठ न्यायालयात जबाब देणे, साक्षी दाखल करणे

### तीन अधिकारी पण...

» महापालिका शहर अभियंतापदी सहशहर अभियंता पदावरील अधिकाऱ्याची सेवाज्येष्ठतेनुसार पदोन्नतीने नियुक्ती केली जाते. मात्र, चार वर्षांपूर्वी शहर अभियंतापदाला समांतर मुख्य अभियंता पदाला सरकारने मंजुरी दिली आहे. त्यापदांवर सहशहर अभियंता पदावरील व्यक्तीलाच पदोन्नती दिली जाते. त्यामुळे सेवाज्येष्ठतेनुसार प्रमोद ओंभासे व संजय कुलकर्णी यांची मुख्य अभियंतापदी वर्णी लागली आहे. सद्यःस्थितीत सहशहर अभियंतापदी मनोज सेठिया कार्यरत आहेत. त्यांच्यासह अन्य अधिकारीही शहर अभियंतापदासाठी स्पर्धेत आहेत.

> महापालिका सेवेतील सहशहर अभियंता पदावरील व्यक्तीची शहर अभियंतापदावर पदोन्नतीने नियुक्ती केली जाते. आताच्या नियुक्ती संदर्भात आयुक्तांशी चर्चा केली जाणार आहे.
>
> - मनोज लोणकर, उपआयुक्त, प्रशासन विभाग, महापालिका

# शहरातील आठही क्षेत्रीय कार्यालयांअंतर्गत व्यापक अतिक्रमण कारवाई

## आयुक्त श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनानुसार तसेच अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या नियंत्रणाखाली कारवाई

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीत महापालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या कालावधीपासून आतापर्यंत आठही क्षेत्रीय कार्यालयांमार्फत एकूण १४३ अनाधिकृत बांधकामे, १ हजार २६० फ्लेक्स, १३ हजार ९७ केऑक्स, ११५ हातगाड्या, ६० टपऱ्या तसेच २ हजार ९९५ टेबल, वजन काटे, खुर्च्या, बाकडे, झेंडे व इतर साहित्य हटविण्यात व जप्त करण्यात आले आहे, अशी माहिती अतिक्रमण विभागाचे (मुख्यालय) सहाय्यक आयुक्त तथा क्षेत्रीय अधिकारी अतुल पाटील यांनी दिली.

आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनानुसार तसेच अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या नियंत्रणाखाली करण्यात आलेल्या या कारवाईमध्ये अतिक्रमण निरीक्षक, बीट निरीक्षक, महाराष्ट्र राज्य सुरक्षा दलाचे जवान तसेच पोलीस प्रशासन यांच्या संयुक्त पथकांचा समावेश होता

तरी शहरातील सार्वजनिक रस्ते, पदपथ व मोकळ्या जागांवर अनधिकृतपणे अतिक्रमण करू नये. भविष्यातही नियमभंग करणाऱ्यांविरोधात अशीच कठोर कारवाई सुरू राहणार आहे, असे महापालिका प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले आहे.





### अतिक्रमण कारवाईची आकडेवारी

» फ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत ३५ अनाधिकृत बांधकामे, ६५ फ्लेक्स, ९६७ केऑक्स, १३ हातगाड्या, ३ टपऱ्या व ५७ इतर साहित्य हटविण्यात आले

» ग क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत ११ अनाधिकृत बांधकामे, ८५ फ्लेक्स, ५१५ केऑक्स, २३ हातगाड्या, १ टपरी व ५२ इतर साहित्यावर कारवाई करण्यात आली.

» ह क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत ५२ अनाधिकृत बांधकामे, ६८ फ्लेक्स, १ हजार १४ केऑक्स, २ हातगाड्या, ६ टपऱ्या व १२६ इतर साहित्य जप्त करण्यात आले.

### अतिक्रमण कारवाईची आकडेवारी

» अ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत १३ अनाधिकृत बांधकामे हटविण्यात आली. यासोबतच ४८ फ्लेक्स, ३ हजार १२१ केऑक्स, ३७ हातगाड्या, ३५ टपऱ्या तसेच ४५२ टेबल, वजन काटे, खुर्च्या, बाकडे, झेंडे व इतर साहित्य जप्त करण्यात आले.

» ब क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत २९ अनाधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यात आली असून ५५७ फ्लेक्स, ३ हजार ५ केऑक्स, ३ हातगाड्या तसेच ४८१ विविध साहित्य जप्त करण्यात आले.

» क क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत २ अनाधिकृत बांधकामे, २७० फ्लेक्स, १ हजार ९३९ केऑक्स, २ हातगाड्या, १३ टपऱ्या व ४८९ इतर साहित्यावर कारवाई करण्यात आली.

» ड क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत अनाधिकृत बांधकाम आढळून आले नसले तरी ९६ फ्लेक्स, १ हजार २१५ केऑक्स, १५ हातगाड्या, १ टपरी व १९ इतर साहित्य हटविण्यात आले.

» इ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत १ अनाधिकृत बांधकाम, ७१ फ्लेक्स, १ हजार २४१ केऑक्स, २० हातगाड्या, १ टपरी तसेच १ हजार ३१९ इतर साहित्यावर कारवाई करण्यात आली.

# पै. श्लोक ताम्हाणे यांनी राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत कमावले कांस्यपदक

## महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाने त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले

**पिंपरी | प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघ, भारतीय कुस्ती संघ व महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 15 वर्षांखालील राज्यस्तरीय फ्रीस्टाईल व ग्रिकोरोमन अंजीक्यपद कुस्ती स्पर्धा 2025-2026 मध्ये पै. श्लोक संदीप ताम्हाणे यांनी ग्रिकोरोमन कुस्ती प्रकारात कांस्यपदक पटकावले.

पिंपरी-चिंचवडचा श्लोक ताम्हाणे यांचे हे यश त्यांच्या कठोर मेहनतीचे आणि कुस्ती क्षेत्रातील निष्ठेचे प्रतीक आहे. महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाने त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले असून, त्यांच्या या कामगिरीने राज्यातील तरुण खेळाडूंना प्रेरणा मिळेल अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

याबाबत आमदार महेश लांडगे म्हणाले की, “श्लोक ताम्हाणे यांनी राज्यस्तरीय स्पर्धेत जो उत्कृष्ट पराक्रम केला आहे, त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन. ही फक्त कांस्यपदक जिंकण्याची गोष्ट नाही, तर मेहनत, चिकाटी आणि धैर्य यांचे उत्तम उदाहरण आहे. पिंपरी-चिंचवड शहर स्पोर्ट्स सिटी बनवण्याचा संकल्प आम्ही केला आहे. भोसरीमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचे कुस्ती व कबड्डी संकुल सुरू झाले असून, त्या ठिकाणी अनेक मल्ल खेळाडू सराव करीत आहेत. आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्केटिंग ग्राउंड, बॉक्सिंग रिंग, शुटींग रेंजसुद्धा सुविधा उपलब्ध होत आहेत. यासोबतच मल्टिपर्पज क्रिकेट स्टेडिअमही प्रस्तावित आहे.श्लोकच्या या यशाने राज्यात कुस्तीच्या क्षेत्रात नव्या पिढीला उत्साह मिळाला असून, भविष्यातील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये महाराष्ट्राचे नाव उजळवण्यासाठी ही प्रेरणा महत्वाची ठरेल.



> ” पै. श्लोक ताम्हाणे यांनी राज्यस्तरीय स्पर्धेत जे यश मिळवले आहे, ते त्यांच्या मेहनत, चिकाटी आणि धैर्याचे उत्तम उदाहरण आहे. आम्ही पिंपरी-चिंचवड शहराला स्पोर्ट्स सिटी बनवण्याच्या दिशेने कार्यरत आहोत. भोसरीतील आंतरराष्ट्रीय दर्जाचे कुस्ती व कबड्डी संकुल, स्केटिंग ग्राउंड, बॉक्सिंग रिंग आणि शुटींग रेंजसारख्या सुविधा सुरू आहेत. यासोबतच मल्टिपर्पज क्रिकेट स्टेडिअमही प्रस्तावित आहे. राज्य सरकार प्रत्येक प्रतिभावंत खेळाडूच्या विकासासाठी संपूर्ण पाठबळ देत राहील.”
>
> - महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

# शुभेच्छांसाठी हार-पुष्पगुच्छ नको; शैक्षणिक साहित्य द्या

## असे आवाहन महापौर रवी लांडगे यांनी केले आहे



**पिंपरी | प्रतिनिधी**

महापौरपदाच्या शुभेच्छा देताना कुणीही हार, पुष्पगुच्छ अथवा अन्य भेटवस्तू घेऊन येऊ नयेत. द्यायचेच असल्यास महापालिका शाळांमधील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य म्हणून उपयोगी ठरेल अशी पुस्तके, वह्या, लेखन साहित्य किंवा अन्य शैक्षणिक वस्तू शुभेच्छा अथवा भेटीच्या वेळी आणाव्यात, असे आवाहन पिंपरी चिंचवडचे महापौर रवी लांडगे यांनी केले आहे.

अनेकजण पुष्पगुच्छ भेट देत आहेत. त्याबाबत महापौर लांडगे म्हणाले, “हार-पुष्पगुच्छ क्षणिक सन्मानाचे प्रतीक असले, तरी विद्यार्थ्यांसाठी दिलेले शैक्षणिक साहित्य त्यांच्या शिक्षणासाठी व भविष्यासाठी अधिक उपयुक्त ठरते. या उपक्रमातून महापालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना थेट शैक्षणिक मदत मिळणार आहे. शिक्षणासाठी आवश्यक मूलभूत साधनांची पूर्तता होण्यास हातभार लागणार आहे. औपचारिक शुभेच्छांऐवजी विद्यार्थ्यांच्या शिक्षणात गुंतवणूक करण्याचा हा सकारात्मक व सामाजिकदृष्ट्या उपयुक्त आहे.”

महापालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक बळ वाढावे, त्यांना आवश्यक साहित्य वेळेवर उपलब्ध व्हावे आणि समाजामध्ये शिक्षणाबाबत सकारात्मक जाणीव निर्माण व्हावी, या उद्देशाने आवाहन करण्यात आले आहे. नागरिकांनी सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवून या उपक्रमाला प्रतिसाद द्यावा, असेही महापौर लांडगे यांनी आवाहन केले आहे.

# महाराष्ट्रातील उद्योग विश्वाचे भरत गीते ब्रँड अँबेसिडर

## सुपा एमआयडीसीत 'तौरल इंडिया'चे भव्य उद्घाटन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रकल्पाचे लोकार्पण

**पुणे | प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाला नवी गती देणारा आणि 'मेक इन इंडिया' संकल्पनेला बळकटी देणारा 'तौरल इंडिया'चा भव्य सुपा प्लांट नुकतेच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते कार्यान्वित झाला. अहिल्यानगर जिल्ह्यातील सुपा एमआयडीसीमध्ये आयोजित या दिमाखदार सोहळ्याला राजकीय, औद्योगिक, सामाजिक क्षेत्रातील अनेक दिग्गज उपस्थित होते. यावेळी बोलताना मुख्यमंत्र्यांनी या प्रकल्पाचे वर्णन 'महाराष्ट्राच्या औद्योगिक आत्मविश्वासाचा उत्सव' असे केले. तसेच महाराष्ट्रातील औद्योगिक विश्वाचे भरत गीते हे ब्रँड अॅम्बेसिडर आहे, असे गौरव उद्गार काढत भरत गीते यांच्या यशस्वीतेला कौतुकाचे थाप दिली.




या सोहळ्याला जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत, विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, खासदार डॉ. भागवत कराड, आमदार सुरेश धस, आमदार काशिनाथ दाते, आमदार विक्रम पाचपुते, जगदीश कदम, जिल्हाधिकारी पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांसह आध्यात्मिक क्षेत्रातील शक्तीपीठे मानले जाणारे भगवानगडाचे ह.भ.प. नामदेव शास्त्री आणि नारायणगडाचे ह.भ.प. शिवाजी महाराज यांनीही या कार्यक्रमाला उपस्थित राहून आशीर्वाद दिले. तौरल इंडियाचे संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी भरत गीते, प्राची गीते तसेच त्यांचे व्यावसायिक भागीदार जर्मनीचे लोथर थोनी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तौराल इंडियाचे संस्थापक आणि सीईओ भरत गीते यांच्या जिद्दीचे विशेष कौतुक केले. ते म्हणाले की, भरत गीते यांनी केवळ एका वर्षात दावोस येथील कराराचे प्रत्यक्षात उत्पादनात रूपांतर करून 'लाइटनिंग स्पीड'ने काम केले आहे. हा प्रकल्प 'इम्पोर्ट सब्स्टिट्यूट' (आयात पर्यायी) क्षेत्रात काम करत असून, ज्या वस्तू पूर्वी परदेशातून आयात कराव्या लागायच्या, त्या आता भारतातच तयार होणार आहेत. डिफेन्स, रेल्वे, ऊर्जा, एरोस्पेस आणि हेल्थकेअर अशा महत्त्वाच्या क्षेत्रांसाठी लागणारे आंतरराष्ट्रीय दर्जाचे अॅल्युमिनियम कास्टिंग येथे तयार होणार असून, यामुळे आत्मनिर्भर भारताच्या स्वप्नाला बळकटी मिळेल.




ते पुढे म्हणाले की, गेल्या १०-११ वर्षांमध्ये माननीय प्रधानमंत्री नरेंद्र मोदीजींच्या नेतृत्वाखाली भारतीय अर्थव्यवस्थेने ज्या वेगाने प्रगती केली आहे, त्यामुळे आपण अकराव्या क्रमांकावरून चौथ्या क्रमांकावर झेप घेतली असून लवकरच आपण तिसऱ्या क्रमांकावर पोहोचू, असा मला ठाम विश्वास आहे. आपण आता पाच ट्रिलियन अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट गाठून पुढे १० आणि ५० ट्रिलियनच्या दिशेने अत्यंत वेगाने वाटचाल करणार आहोत. ही आर्थिक गती कायम राखण्यासाठी देशातील तंत्रज्ञान आणि उत्पादन क्षेत्रास अत्यंत पोषक ठरत आहे. आज उत्पादन क्षेत्रात ज्या प्रकारचे नवनवीन तंत्रज्ञान येत आहे आणि ज्या पद्धतीने या क्षेत्राचे नियमन व आधुनिकीकरण होत आहे, ते पाहता हे उद्योगच आपल्या देशाची पुढची वाटचाल निश्चित करणारे ठरणार आहेत. भारताच्या या देदीप्यमान प्रगतीमध्ये जर कोणी सर्वात दमदार पाऊल टाकत असेल, तर तो आपला महाराष्ट्र आहे, हे सांगताना मला मनापासून अभिमान आणि आनंद वाटतो.

राज्यातील गुंतवणुकीवर भाष्य करताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, उत्तर महाराष्ट्रातील पाच जिल्ह्यांमध्ये सरकारने ५० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक आणली असून, त्यातील एकट्या नगर जिल्ह्यात ११,५१९ कोटी रुपयांची गुंतवणूक होत आहे. यातून जिल्ह्यात १८ हजार तर संपूर्ण उत्तर महाराष्ट्रात ७५ हजार नवीन रोजगार निर्माण होणार आहेत. दावोसमध्ये झालेल्या करारांपैकी ७५ टक्के करार प्रत्यक्षात उतरले असून, महाराष्ट्र हे गुंतवणुकीसाठी देशातील सर्वात पसंतीचे राज्य बनले आहे.

भरत गीते यांनी जर्मनीचे लोथर थोनी यांच्यासोबत भागीदारी करून जागतिक दर्जाचे तंत्रज्ञान महाराष्ट्रात आणले आहे. १० कामगारांपासून सुरू झालेला हा प्रवास आज १ हजार कामगारांपर्यंत पोहोचला असून लवकरच तो ३ हजार लोकांपर्यंत जाईल, असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. यावेळी भरत गीते यांच्या कन्येने स्वतःच्या हाताने तयार केलेले ग्रीटिंग मुख्यमंत्र्यांना भेट दिले, ज्याचे त्यांनी कौतुक केले.

यावेळी उद्योजक भरत गीते यांच्या कामाचे विशेष कौतुक करताना फडणवीस म्हणाले की, गीते हे अत्यंत प्रामाणिकपणे आणि निष्ठेने प्रयत्न करणारे उद्योजक असून त्यांच्यासारखे व्यक्तिमत्त्व घडणे हे महाराष्ट्रासाठी एका रत्नासारखे आहे. अशा उद्योजकांच्या पाठीशी राज्य सरकार खंबीरपणे उभे राहील, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली. समाजात कधीकधी चांगल्या उद्योजकांना विनाकारण त्रास देणाऱ्या अपप्रवृत्ती डोके वर काढतात, मात्र अशा प्रवृत्तींना आळा घालण्यासाठी पोलीस आयुक्तांना कडक कारवाईचे आदेश देण्यात आले आहेत. कोणत्याही प्रकारची झुंडशाही किंवा गुंडशाही खपवून घेतली जाणार नाही आणि अशा लोकांना कायदेशीर मार्गाने कडक धडा शिकवला जाईल, जेणेकरून पुन्हा कोणाचीही अशी हिम्मत होणार नाही, असा स्पष्ट इशाराही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिला.

### उद्योजकांना सर्व सहकार्य देणार – उद्योग मंत्री उदय

**» या प्रसंगी बोलताना उद्योग मंत्री उदय सामंत असे म्हणाले की, मी भरत गीते यांना पॅपफर्ड येथे पुरस्कार दिला. परंतु आज त्यांच्या आईच्या डोळ्यात असणारे आनंद अश्रू हे त्या पुरस्कारापेक्षा मला मोठे वाटतात. कामगार ते मालक हा त्यांचा प्रवास थक्क करणार आहे. याचा आम्हा सर्व मित्रांना सार्थ अभिमान आहे. तुमचं नातं ग्रामीण भागाशी जोडलेलं आहे. तिथल्या लोकांच्या उद्योजकांकडून काय अपेक्षा काय आहेत हे तुम्ही चांगल्या प्रकारे समजू शकता. दहा कामगारांपासून सुरू झालेला तुमचा हा प्रवास आज हजारो कामगारांपर्यंत पोहोचला आहे, जो सर्व मराठी उद्योजकांसाठी एक मोठा आदर्श आहे. त्यामुळे राज्याचा उद्योग मंत्री म्हणून तुम्हाला जे जे सहकार्य लागेल ते मी नक्की करेन, असे आश्वासन देतो.**






# पुण्याच्या विकासाला आणि पर्यावरण संवर्धनाला प्राधान्य

## नवनिर्वाचित महापौर मंजुषा नागपूरे यांची ग्वाही..., पुणेकरांना अपेक्षित असलेले प्रकल्प वेगाने पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील राहणार

**पुणे | प्रतिनिधी**

देशातील पहिल्या दहा प्रमुख शहरांमध्ये पुण्याचा समावेश होत असल्याने महापौर पदाची जबाबदारी मोठी असल्याची जाणीव असल्याचे नवनिर्वाचित महापौर मंजुषा नागपूरे यांनी सांगितले. पुणे महापालिकेच्या विशेष सभेत अभिनंदनाला उत्तर देताना त्यांनी केंद्र आणि राज्य सरकारच्या सहकार्याने पुणेकरांना अपेक्षित असलेले प्रकल्प वेगाने पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे स्पष्ट केले.

महापौर नागपूरे यांनी राष्ट्रमाता जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज, लोकमान्य टिळक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचे स्मरण करून ही जबाबदारी स्वीकारल्याचे नमूद केले. तसेच पुण्याच्या राजकारणातील मार्गदर्शक आणि माजी महापौर मुक्ता टिळक यांचा उल्लेख करत त्यांनी सार्वजनिक जीवनात जनहिताला सर्वोच्च प्राधान्य देण्याची भूमिका मांडली.




### सार्वजनिक जीवनात जनहिताला सर्वोच्च प्राधान्य

**» महापौर नागपूरे यांनी राष्ट्रमाता जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज, लोकमान्य टिळक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचे स्मरण करून ही जबाबदारी स्वीकारल्याचे नमूद केले. तसेच पुण्याच्या राजकारणातील मार्गदर्शक आणि माजी महापौर मुक्ता टिळक यांचा उल्लेख करत त्यांनी सार्वजनिक जीवनात जनहिताला सर्वोच्च प्राधान्य देण्याची भूमिका मांडली.**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे शताब्दी वर्ष सुरू असताना ही जबाबदारी मिळाल्याने समाजाप्रती असलेले दायित्व प्रामाणिकपणे पार पाडण्याची ग्वाही त्यांनी पुणेकरांना दिली. संघाच्या शताब्दी निमित्ताने मांडण्यात आलेल्या पंच परिवर्तनातील पर्यावरण आणि नागरिकत्व या दोन मुद्द्यांचा उल्लेख करत त्यांनी पाणी संवर्धन, वृक्षसंवर्धन आणि प्लास्टिकमुक्ती ही उद्दिष्टे पुण्यासाठी महत्त्वाची असल्याचे सांगितले.

पुण्याचे सांस्कृतिक आणि सुंदर शहर म्हणून असलेले लौकिक टिकवण्यासाठी पर्यावरण संवर्धनास प्राधान्य देणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली पुण्याच्या विकासाला मोठी गती मिळाल्याचे सांगत, पुणेकरांना अपेक्षित असलेले मोठे प्रकल्प यापुढेही यशस्वीपणे पूर्ण होत राहतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

### विकासाला आणि पर्यावरण संवर्धनाला प्राधान्य

**» राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे शताब्दी वर्ष सुरू असताना ही जबाबदारी मिळाल्याने समाजाप्रती असलेले दायित्व प्रामाणिकपणे पार पाडण्याची ग्वाही त्यांनी पुणेकरांना दिली. संघाच्या शताब्दी निमित्ताने मांडण्यात आलेल्या पंच परिवर्तनातील पर्यावरण आणि नागरिकत्व या दोन मुद्द्यांचा उल्लेख करत त्यांनी पाणी संवर्धन, वृक्षसंवर्धन आणि प्लास्टिकमुक्ती ही उद्दिष्टे पुण्यासाठी महत्त्वाची असल्याचे सांगितले.**

महापौर पदाची जबाबदारी केवळ आपली किंवा एका पक्षाची नसून, पुण्यातील प्रत्येक नागरिकाच्या आरोग्य सुविधा, पर्यावरण रक्षण आणि शहराच्या सर्वांगीण प्रगतीसाठी सर्वांनी एकत्रितपणे काम करण्याची गरज असल्याचे नागपूरे यांनी सांगितले. नगरसेवक पुन्हा आल्यानंतर शहराच्या कारभारात गुणात्मक फरक पडतो, हे पुणेकरांना दाखवून देण्याची हीच वेळ असल्याचे त्यांनी नमूद केले. प्रशासनाच्या हातात हात घालून आणि पुणेकरांना विश्वासात घेऊन सर्वांनी मिळून शहराचा कारभार चालवूया, असे आवाहन करत त्यांनी भाषणाचा शेवट 'जय हिंद' या घोषणेने केला.

मंजूषा नागपुरे या सलग तिसऱ्यांदा नगरसेवक म्हणून निवडून आल्या आहेत. यंदाच्या महापालिका निवडणुकीत त्यांनी प्रभाग क्रमांक ३४ मधून बिनविरोध विजय मिळवला होता. महापालिकेतील त्यांचा अनुभव, पक्षातील कार्य आणि संघटनात्मक कामकाजाची जाण लक्षात घेता त्यांच्या नावावर एकमत झाले. मंजूषा नागपुरे या कडव्या हिंदुत्ववादी विचारसरणी, भाजपच्या निष्ठावंत नगरसेविका म्हणून ओळखल्या जातात. महापालिकेच्या कामाच त्यांचा चांगला अनुभव आहे. स्थायी समितीसारख्या महत्त्वाच्या समितीवर त्यांनी काम केले आहे

# शरद पवार यांची तब्येत बिघडली, पुण्याच्या रुबी हॉल क्लिनिकमध्ये दाखल

## अचानक त्रास वाढल्यामुळे त्यांना बारामतीमधून पुण्याच्या रुबी हॉल क्लिनिकमध्ये दाखल करण्यात आलं आहे

**पुणे | प्रतिनिधी**

राष्ट्रवादी शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांची तब्येत बिघडली आहे, त्यांना बारामतीमधून पुण्याच्या रुबी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आलं आहे. शरद पवार यांच्या सोबत त्यांच्या कन्या सुप्रिया सुळे या देखील आहेत.

मोठी बातमी समोर येत आहे, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांची प्रकृती बिघडली आहे, त्यांना उपचारासाठी पुण्याच्या रुबी हॉल क्लिनिकमध्ये दाखल करण्यात आलं आहे.



गेल्या काही दिवसांपासून शरद पवार यांची तब्येत बरी नसल्याचं बोललं जात होतं, मात्र आज अचानक त्रास वाढल्यामुळे त्यांना बारामतीमधून पुण्याच्या रुबी हॉल क्लिनिकमध्ये दाखल करण्यात आलं आहे. रुबी हॉल प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार शरद पवार यांना खोकल्याचा त्रास होत असल्यामुळे त्यांची आधी

### डॉक्टरांनी काय सांगितलं?

**» शरद पवारांच्या प्रकृतीबाबत डॉक्टर परवेझ ग्रँट म्हणाले की आमच्या डॉक्टरांचं एक पथक शरद पवार यांच्या प्रकृतीची काळजी घेत आहे. काही चाचण्या करण्यात आल्या आहेत त्यानंतर औषधांचा दिनक्रम आणि प्रमाण ठरवता येईल**

तपासणी होईल आणि त्यानंतर त्यांना रुग्णालयात दाखल करून घ्यायचं का घरी सोडायचं यावर निर्णय घेतला जाणार आहे.

आज सकाळपासूनच शरद पवार यांना खोकल्याचा त्रास होत आहे. रुबी हॉलचे डॉक्टर ग्रँट यांनी दिलेल्या माहितीनुसार, पुढील काही वेळात शरद पवार यांची तपासणी होणार आहे. त्यानंतर त्यांच्यावर काय उपचार करायचे ते ठरवलं जाणार आहे. जर गरज वाटली तर त्यांना रुग्णालयात ॲडमिट करून घेतलं जाईल, परिस्थितीनुसार आम्ही निर्णय घेऊ असं डॉक्टरांनी सांगितलं आहे.